महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१६९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ मे, २०१७

संदर्भ : शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्र. शिक्षण/प्राथ./ईओस्पे/व्ही १५३/१७, दिनांक २०/०४/२०१७

प्रस्तावना -

इडन एज्युकेशन सोसायटी, ५ लॅन्डमार्क कन्डोनीनियमस, औंध रोड, पुणे संचलित इडेन इंटरनॅशनल स्कुल, , मौजे कातवी, एमआयडीसी रोड, तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी, सर्व शाखा, सीआयसीएसई, इंग्रजी ) शाळेस स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबतचा शासन निर्णय खालील प्रमाणे आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेला खालील प्रस्ताव पात्र ठरत असल्यामुळे या प्रस्तावास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | इडन एज्युकेशन सोसायटी, ५ लॅन्डमार्क कन्डोमीनियमस, औंध रोड, पुणे | इडेन इंटरनॅशनल स्कुल, , मौजे कातवी, एमआयडीसी रोड, तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे | नवीन | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी, सर्व शाखा, सीआयसीएसई, ) | इंग्रजी |

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनानी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

३१/०५/२०१७
कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग

क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी,आयजीसीएसई आणि सीआयई ईत्यादि शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास/शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (PERMISSION) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जुन, २०१२ मधील

विहित केलेल्या सर्वकश धोरणानुसार नाहरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (RECOGNITION) घेणे आवश्यक आहे. शाळांना अशी मान्यता (RECOGNITION) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/शिक्षण निरिक्षक, बृहंमुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासंह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता नाहरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करून सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नेसाठी नाहरकत प्रमाणपत्र देईल.

२.३ सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधिल सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी शिक्षण उपसंचालक, पुणे यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.७ यु-डायस डाटा- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
७. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (प्राथमिक /माध्यमिक), पुणे
८. निवडनस्ती (एसएम २).